जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 AUG 2019
तरुण भारत

# विद्यापीठाकडून दहा लाख लिटर पाणी पुरवठा

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती : नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

महापुरामुळे कोल्हापूर शहराचा पाणीपुरवठा खंडीत झाला आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून शिवाजी विद्यापीठाने शहरवासियांना गेल्या चार दिवसांत विद्यापीठातील जलशुद्धीकरण केंद्रामधून सुमारे दहा लाख लीटरहून अधिक पाणी पुरवठा केला आहे. जलशुद्धी केंद्रावर दिवसभर शहरवासीयांची गर्दी असते, अशी माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

**पूरग्रस्तांना ४० ट्रॉली चारा**

महापुराच्या पाण्याखाली पिके गेली. स्वतःबरोबर जनावरांच्या पोटाचा प्रश्न कसा सोडवायचा असा प्रश्न पूरग्रस्तांसमोर उपस्थित झाला. शिवाजी विद्यापीठाने मुक्या जनावरांसाठी गेल्या चार दिवसापासून ४० ट्रॉली चारा-वैरणीचा पुरवठा केला. पूरग्रस्तांबरोबर त्यांच्या जनावरांच्या पोटाचा प्रश्न मिटवल्याने अनेक पूरग्रस्तांनी विद्यापीठ प्रशासनाचे आभार मानले.

पत्रात म्हटले आहे, महापुरामुळे शहराला पाणीपुरवठा करणारी महानगरपालिकेची जल शुद्धीकरण यंत्रणा पाण्याखाली जाऊन नादुरुस्त झाली आहे. त्यामुळे विद्यापीठाने शहराला पाणीपुरवठा केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या जलशुद्धीकरण केंद्रावरुन पाणी भरून नेण्यासाठी महानगरपालिकेच्या टँकरसह अन्य वाहनांची लागलेली रांग.

# परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठातर्फे ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या परीक्षांचे अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रात निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे हा निर्णय घेण्यात आलेला आहे.

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात असणाऱ्या कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन जिल्ह्यांत महापुराने थैमान घातले होते. त्यामुळे महापुराच्या काळात शिवाजी विद्यापीठास सुटी देण्यात आली होती. शिवाजी विद्यापीठातर्फे ऑक्टोबर आणि नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या परीक्षांचे अर्ज भरण्यास आणि प्रवेश शुल्क भरण्यास मुदतवाढ देण्यात आलेली आहे. याबाबतची सविस्तर माहिती शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी असे आवाहन करण्यात आले.

पुण्यनगरी



कोल्हापूर : महावीर महाविद्यालयातील महिला वसतिगृहाच्या परिसरातील आपत्तीग्रस्त विभागाची पाहणी करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

# पूरबाधित महाविद्यालयांची कुलगुरूंकडून पाहणी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

कोल्हापूर शहरातील शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय आणि महावीर महाविद्यालय या दोन ठिकाणी महापुराचे पाणी शिरल्याने झालेल्या नुकसानीची शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पाहणी केली. यावेळी त्यांच्यासमवेत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड होते.

दसरा चौक येथील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय आणि न्यू पॅलेस परिसरातील महावीर महाविद्यालय या दोन्ही महाविद्यालयांच्या परिसरात महापुराचे पाणी शिरले होते. शहाजी महाविद्यालयाच्या तळमजल्यावरील सर्व खोल्यांमध्ये पुराचे पाणी निम्म्याहून अधिक उंचीपर्यंत चढले होते. यामुळे तळमजल्यांवरील वर्गखोल्यांसह प्रशासकीय कार्यालय आणि विशेषतः रसायनशास्त्र विभागाची प्रयोगशाळा यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्याचप्रमाणे महावीर महाविद्यालयातील महिला वसतिगृहाच्या तळमजल्यावरील सभागृह आणि तेथील ग्रंथालय, त्याचप्रमाणे त्यांच्या प्रांगणातील आचार्य विद्यानंद संस्कृती भवन या सभागृहाच्या तळमजल्यात पूर्णतः पाणी भरले होते. शहाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण यांना या आपत्तीच्या क्षणी विद्यापीठ महाविद्यालय प्रशासनासोबत असून त्यांना या परिस्थितीतून सावरण्यास आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, असे कुलगुरूंनी आश्वस्त केले.

यानंतर कुलगुरू डॉ. शिंदे यांनी शिवाजी पूल, कुंभारवाडा, शाहूपुरी, हुतात्मा पार्क आदी परिसरात फिरून उद्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमार्फत कोठे कोठे स्वच्छता मोहीम राबविता येऊ शकेल, याचीही चाचपणी केली.

## विद्यापीठाचा समुपदेशन कक्ष

कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांतील पूरस्थितीमुळे आपत्तीग्रस्त भागातील जीवन पुरते उद्‌ध्वस्त झाले आहे. या आपत्तीग्रस्तांना या परिस्थितीतून सावरण्यासाठी पुढील टप्प्यात समुपदेशनाची मोठी गरज असल्याची बाब लक्षात घेऊन विद्यापीठाच्या एमएसडब्ल्यू विभागातर्फे समुपदेशन कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. आपत्तीग्रस्त नागरिकांची आपत्तीग्रस्त भागात जाऊन प्रत्यक्ष भेट घेऊन समुपदेशन करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन दोन प्राध्यापकांसह तीस विद्यार्थ्यांची टीम तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 AUG 2019
सकाळ

# परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ



कोल्हापूर : पूरस्थितीमुळे बरीचशी महाविद्यालये आठ ते दहा दिवस बंद होती. त्यामुळे दिलेल्या मुदतीत परीक्षा अर्ज भरणे शक्य झाले नाही. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठाच्या परीक्षेत ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये हिवाळी सत्र परीक्षेचे अर्ज भरण्याची मुदत १ ऑगस्टपर्यंत भरण्याची मुदत होती. मात्र, जिल्ह्यात अतीवृष्टी झाल्याने दहा दिवस शाळा व महाविद्यालयांना सुट्टी होती. त्यामुळे अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानंतर १ ते ७ सप्टेंबरपर्यंत ५० रुपये विलंब शुल्क भरून अर्ज भरता येईल. या काळातही जे विद्यार्थी अर्ज भरू शकणार नाहीत त्यांच्यासाठी ३५० रुपये विलंब शुल्क भरून ८ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर या कालावधीत अर्ज भरता येणार आहेत, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 AUG 2019
सकाळ

# विद्यार्थी परिषद निवडणुका पूरस्थितीमुळे केल्या स्थगित

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत असणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थी परिषद निवडणुका महापुरामुळे स्थगित करण्यात आल्या आहेत. काल (ता. १३) झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. पुढील आदेश आल्यानंतर नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात येईल, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाने दिली आहे.

महाराष्ट्रातील महाविद्यालयीन निवडणुका १२ वर्षांपूर्वी बंद करण्यात आल्या होत्या. याबाबत न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर निकाल देताना न्यायालयाने निवडणुका पूर्ववत सुरू कराव्यात, असे राज्य सरकारला सांगितले. त्यानुसार राज्य सरकारने २०१९-२० या वर्षात निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला. शिवाजी विद्यापीठांतर्गत हा निवडणूक कार्यक्रम १ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत होणार होता. त्यातील पहिला आरक्षण सोडतीचा टप्पाही पूर्ण झाला. ९ ऑगस्टपासून मतदार याद्या जाहीर करण्यात येणार होत्या. मात्र, सलग दहा दिवस झालेल्या मुसळधार पावसाने कोल्हापूर आणि सांगली या जिल्ह्यात महापूर आला. त्यामुळे महाविद्यालये दहा दिवस बंद होती. यामुळे विहीत कार्यक्रम वेळेत झाला नाही. त्यातच विधानसभा निवडणूक, गणेशोत्सव आगामी काळात आहेत. यामुळे काल मंत्रिमंडळाच्या बैठकीत निवडणुकांना स्थगिती दिली.